N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** कर्जत

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0272 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/10/2023 01:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 अ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 17/10/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/10/2023
**Time From (वेळेपासून):** 15:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/10/2023 **Time (वेळ):** 01:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/10/2023 01:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दूय्यमनिबंधक कार्यालयाचे, रेकर्डरूमचे बाहेर,कर्जत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नवीन युजीन रो[illegible]रियो

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डी विंग 202, न्यु हार्वर्ड ,गार्डन, ग्रिन वुड कम्प्लेक्स,हिरानंदानी ठाणे 400610,चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | डी विंग 202, न्यु हार्वर्ड ,गार्डन, ग्रिन वुड कम्प्लेक्स,हिरानंदानी ठाणे 400610,चितळसर मानपाडा पोलीस स्टेशन,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9819077756

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहन पुंडलीक गायकवाड | | | 1. मु बिड, घर नं 75, ,ताकर्जत, कर्जत,रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद शासकीय विश्रामगृह कर्जत

दिनांक 17/10/2023

मी, गॅवीन युजीन रोझारियो वय-34 वर्षे, धंदा:- व्यवसाय (ब्लिस हॉस्पीटॅलीटी अँन्ड कन्सलस्टंन्सी,) राहणार- डी विंग 202, न्यु हार्वर्ड गार्डन, ग्रिन वुड कॉम्प्लेक्स, हिरानंदानी ठाणे 400610, समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई कार्यालयात हजर राहून तक्रार लिहुन देतो की, मो. नं. 9819077756

मी वरील प्रमाणे असून वरिल ठिकाणी कुटूंबासमवेत राहत आहे. मी ब्लिस हॉस्पीटॅलीटी अँन्ड कन्सलटंन्सी या नावाची माझी स्वतःची कंपनी असुन, सदर कंपनीमार्फत मी ठाणे, कर्जत, पुणे, परीसरातील टायटल क्लिअर नसलेल्या जमीनी खरेदी करून, त्यांचे टायटल क्लिअर करून, त्यांची विक्री करण्याचा व्यवसाय करतो. सदर कंपनीचे कार्यालय एफ-18, इंटरनिटी मॉल, ठाणे पश्चीम येथे आहे.

माझे व्यवसायातील भागीदार श्री श्रीकृष्ण सोनावणे हे असुन त्यांची वडीलोपार्जीत जमीन कर्जत येथील जवळपासच्या गांवात जागा आहे. सदर जागेचे टायटल क्लिअर नसल्याचे श्रीकृष्ण सोनावणे यांनी मला सांगीतले होते. त्यामुळे मी दस्त क्रमांक 1207/2007, 1000/2007, 9970/2007, 7150/2007, 5160/2007, तसेच 1012/2008, 719/2008, 3030/2008, 2121/2008, 2200/2008, अशा दहा जागेच्या मालकी बाबतचे दस्त मिळणेकरीता, सब रजिस्टार ऑफिस, कर्जत जिल्हा रायगड येथे दिनांक 12/09/2023 रोजी अर्ज केला. त्यावेळी मी सब रजिस्टार ऑफिस, कर्जत येथील रेकॉर्ड रुममध्ये उपस्थित असलेले, रेकॉर्ड किपर श्री मोहन गायकवाड यांना भेटलो, त्यांचेशी मला पाहिजे असलेल्या दस्ताची चौकशी केली. त्यावेळी श्री मोहन गायकवाड यांनी मला किती दस्त आहेत याबाबत विचारले असता, मी त्यांना दहा दस्त असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांनी दहा दस्तांची साक्षांकित प्रत देण्यासाठी शासकीय फि व्यतिरिक्त रूपये 7000/- द्यावे लागतील असे मला सांगीतले. त्यांनतर माझी शारीरीक प्रकृती ठिक नसल्याने मी सदर कामाचा पाठपुरावा करू शकलो नाही त्यानंतर दिनाक 15/10/2023 रोजी मी श्री मोहन गायकवाड यांना त्यांचे मोबाईल क्र. 9272725472 वर फोन करून दहा दस्तांच्या साक्षांकीत प्रति तयार असल्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी 'यापूर्वी सांगितलेले पैसे घेउन या दस्त तयार करून देतो' असे सांगीतले. त्यावेळी माझी खात्री झाली की, श्री मोहन गायकवाड हे रु. 7000/- घेतल्याशिवाय दस्ताच्या साक्षांकित प्रती देणार नाहीत. तरी श्री मोहन गायकवाड हे मागत असलेली रक्कम, शासकीय फि व्यतीरिक्त रू.7000/- ही लाचेची रक्कम असून ती त्यांना दयायची माझी इच्छा नसल्याने श्री मोहन गायकवाड यांच्या विरूध्द कायदेशिर कारवाई होणेबाबत मी दिनांक 17/10/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली. त्यासोबत मी सब रजिस्टर कार्यालय, कर्जत यांना दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत तक्रारीसोबत सादर केलेली आहे.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेच्या मागणीची सत्यता पडताळणी करण्याकरीता पोलीस उपअधिक्षक शिवराज म्हेत्रे यांचे सूचनेवरुन पोलीस निरीक्षक श्रीमती अरूंधती येळवे यांनी उप प्रादेशीक परिवहन कार्यालय पनवेल कार्यालयास लेखी पत्र देवून दोन शासकिय पंच साक्षीदार मागविले. पंच साक्षीदार अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर पोनि श्रीमती अरूंधती येळवे, ए.सी.बी. नवी मुंबई यांनी पंचांना माझी ओळख करून दिली. सदरवेळी मी, पंच साक्षीदार यांना माझे तक्रारीची थोडक्यात हकिकत सांगितली व माझी लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली असता पंचानी सदरची तक्रार वाचुन माझे तक्रारीवर सही केली. त्याचवेळी पोनि अरूंधती येळवे,यांनी मला सदर पडताळणी पथकातील पोलीस अंमलदारांची ओळख करून दिली.

त्यानंतर मी पडताळणी पथकासमवेत कर्जत येथे पोहचल्यानंतर रेकॉर्ड किपर श्री मोहन गायकवाड यांना फोन करून ते उपलब्ध असल्याची खात्री केली.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने सब रजिस्टार ऑफिस कर्जत येथील रेकॉर्ड किपर श्री मोहन गायकवाड यांचे लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी करीता मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच साक्षीदार यांचे समवेत

दिनांक 17/10/2023 रोजी 14.34 वा ते 14.40 वाजेदरम्यान सब रजिस्टार कार्यालय, कर्जत येथे श्री मोहन गायकवाड याना रेकॉर्डरूममध्ये भेटलो त्यावेळी रेकॉर्ड किपर श्री गायकवाड हे ''तेच सांगितलं....एक सेट झालेला आहे आपला.... एक सेट राहिलेला आहे....'' असे मला बोलले. त्यावेळी मी त्यांना कोणत्या गावाचा राहिलाय याबाबत विचारले असता त्यांनी मला डिटेल पाठवीले असल्याचे सांगुन 'नउ कॉपी तयार असुन दहावी कॉपी ओपन होत नसल्याचे' मला सांगीतले. त्यांनतर मी त्यांना पुढची प्रोसेस काय आहे असे विचारले असता, मोहन गायकवाड हे मला ''आता काय नाय... आता घेवून जायचंय तुम्हाला फक्त....आणी ती एक राहिलेली जी आहे....हा तुम्ही ते देणारच आहेतच ना बोलले होते.....'' असे बोलून गायकवाड हे मला साडेतीन हजार रुपये खर्च झालेला आहे....'' असे बोलले त्यावेळी मी त्यांना आता किती दयावे लागतील असे विचारले असता त्यांनी हाताच्या पाच बोटांचा इशारा केला. त्यावेळी ''पाच हजार?..... चालेल.... मी....माझं वॉलेट गाडीत आहे.....'' असे बोललो. त्यावर त्यांनी त्यास सहमती दर्शवली त्यांनतर ''तुमचंच दयायचयं की.... बाकी मॅडमचपण काय वेगळ....'' असे मी विचारले असता श्री गायकवाड हे ''त्यांना मी काहीच काय बोललो नाय.....आता तुम्ही काय बोलाल तेव्हाच ना मग मला....स्पष्ट सांगू का तुम्हाला.... मला सात हजार रुपये देवून टाका टोटल....'' असे बोलेले. त्यावर मी त्यांना मी ''देवून टाकतो.... म्हणजे सात हजार रुपये तुमचंच आहे की.... मॅडमलापण वेगळं दयायचं....'' असे बोललो. त्यावेळी श्री गायकवाड हे ''नाय मॅडमला.... त्यांचा दुसरा स्टाफ आहे ना....तो नुसता आढी मारतो.....मला किती पाचतात.... तीन साडेतीरेकॉर्ड रूम मधील इसमास गायकवाड यांचेबाबत विचारणा केली असता ते जेवायला गेले असे सांगुन 'फोन करा' असे मला सांगीतले. त्यानंतर मी रेकॉर्ड रूमच्या बाहेर थांबलो असतांना श्री गायकवाड हे रेकॉर्डरूमकडे येत असताना मला दिसले सदरठिकाणी रेकॉर्डरूमच्या बाहेर माझी श्री गायकवाड यांचेशी भेट झाली. त्यावेळी श्री गायकवाड हे मला एका दस्तावर साईन करून घेतली असल्याचे बोलेले. व 8 दस्ताच्या साक्षांकित प्रती मला देवुन, उर्वरीत दस्तांकरीता नवीन अर्जावर माझी स्वाक्षरी घेतली. त्यावेळी मी त्यांना आरामात दिले तरी चालेल असे बोलुन, आता किती?... तुम्हाला देवू.....असे बोललो असता, ''दया तुम्हाला काय दयायचे ते.....काय विशय आहे....जास्त असते तर वेगळी गोष्ट आहे....असे गायकवाड बोलले.त्यावेळी मी त्यांना त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रू. 7000/- देवुन मोजुन घेण्याबाबत बोललो असता, राहुदे.... तू बोललाय ना..... आहे मला विश्वास तुझ्यावरती.... काय विषय नाय ....'' असे बोलुन लाचेची रक्कम रू. 7000/- उजव्या हाताने स्विकारली, त्यानंतर मी पुर्वनियोजीत इशारा सापळा पथकास केल्यानंतर सापळा पथकाने श्री. मोहन गायकवाड यांना लाचेच्या रक्कमेसह 15.31 वा. त्यांच्या ताब्यात घेतले आहे.

त्यानंतर रेकॉर्ड किपर श्री मोहन गायकवाड यांना पोउपअधि श्री शिवराज म्हेत्रे व पोनि श्रीमती येळवे यांनी त्याचे नाव व पद याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याचे नाव मोहन पुंडलीक गायकवाड वय 35 वर्षे राहणार घर नंबर 75, मुक्काम बिड, ता.कर्जत जि.रायगड असे सांगुन ते शासकीय कर्मचारी नसुन खाजगी इसम असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री. मोहन गायकवाड हे शासकिय कर्मचारी आहेत किंवा कसे? याबाबत श्रीमती सावंत, दुय्यम निबंधक, वर्ग-1, कर्जत-1ए जि. रायगड यांचेकडे पोलीस पथकाने खात्री केली केली असता, श्री मोहन गायकवाड हा खाजगी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानतर शासकिय विश्रामगृह कर्जत येथे आरोपी मोहन पुंडलीक गायकवाड (खाजगी इसम) यांच्या विरुध्द सापळा पंचनामा कारवाई पूर्ण करण्यात आली आहे.

तरी मोहन पुंडलीक गायकवाड(खाजगी इसम) वय 35 वर्षे राहणार- घर नंबर 75, मुक्काम बीड, ता.कर्जत, जि.रायगड यांनी दिनांक 17/10/2023 रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान कर्जत परिसरातील जागेच्या दस्तांच्या दहा साक्षांकीत प्रती दुय्यम निबंधक कार्यालय श्रेणी 1, कर्जत 1, जि. रायगड या शासकिय कार्यालयातून काढून देण्याकरीता स्वतःकरीता तसेच कार्यालयातील इतर कर्मचा-यांकरिता रू.7,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून, सापळा कारवाई दरम्यान रू. 7,000/- लाचेची रक्कम स्विकारली असता, त्यांना दुय्यम निबंधक कार्यालय श्रेणी 1, कर्जत 1, जि. रायगड येथील कार्यालयाच्या रेकॉर्ड रूमच्या आवारात लाचेच्या रक्कमेसह 15.31 वा. सापळा पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. म्हणून माझी मोहन पुंडलीक गायकवाड(खाजगी इसम) वय 35 वर्षे राहणार घर नंबर 75, मुक्काम बीड ता.कर्जत जि.रायगड यांच्याविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(अरुंधती येळवे)

हे लिहून दिले सही

पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

surendra jagnnath garad(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank** (पद)**:** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** surendra jagnnath
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**)**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)